


# प्रथम: पाठ: ।
# सुभाषितमाला – १।

**विषयप्रवेश -**

- परिचय
- शब्दार्थ
- भाषांतर
- स्वाध्याय

## परिचय =

सुभाषित म्हणजे लहान उपदेशपर, आनंदित करणारे सुवचन होय. सुभाषिते ही संस्कृत साहित्य सागरातील अमोल रत्नेच होय. संस्कृत भाषेतील एक सांस्कृतिक ठेवा होय.

## शब्दार्थ –

१) अयम् = हा
२) निज: = स्वत:चा
३) वा = किंवा
४) पर: = परका
५) गणना = विचार, हिशेब
६) लघुचेतसाम् = क्षुद्र मनोवृत्तीचा
७) वसुधा = जग, पृथ्वी
८) कुटुम्बकम् = परिवार
९) उदरचरितानाम् = थोर मनाच्या
१०) प्रियवादिन: = गोड बोलणारे
११) वक्ता = बोलणारा
१२) जीमूतवाहन: = विद्याधरांच्या राजाचे नाव (परोपकारी राजा)
१३) बलम् = शक्ती
१४) स्वेदम् = धाम
१५) श्रेयसे = कल्याणासाठी
१६) किमु = काय सांगावे
१७) बीजम् = बीज
१८) उप्तम् विना = पेरल्याशिवाय
१९) पुरुषकार = उद्योग
२०) पथ्यस्य = हितकारक
२१) श्रोता = ऐकणारा

## भाषांतर

➢ हा श्लोक पंचतंत्रातील आहे. ज्यांचे अंत:करण विशाल आहे अशा संत लोकांच्या मनात 'हे विश्वाचे माझे घर' भावना असते.



अयं निज: परो वेति गणना लघुचेतसाम्।
उदारचरितांना तु वसुधैव कुटुम्बकम्॥१॥

उत्तर: 'हा माझा किंवा हा परका आहे' – असा विचार क्षुद्र मन असलेल्या माणसांचा असतो. परंतू थोर मनाच्या माणसांच्या मनात संपूर्ण (पृथ्वी) जग हेच कुटुंब वाटते.

➢ सर्वांना सर्व काही देण्याची थोर लोकांची मनोवृत्ती असते.







कर्णस्त्वचं शिबिर्मांसं जीवं जीमूतवाहन:।
ददौ दधीचिरस्थीनि नास्त्यदेयं महात्मनाम्॥२॥

उत्तर: कर्णाने त्वचा (कवचकुंडले), शिबिराजाने मांस, जीमूतवाहन राजाने प्राण (व) दधीचि ऋषीनी (स्वत:ची) अस्थी या (गोष्टी) दिल्या, थोर लोकांच्या बाबतीत देण्यास अयोग्य असे नसते.

➢ **राष्ट्राच्या प्रगतीसाठी शक्ती, रक्त, परिश्रम, घाम या चारही घटकांचे महत्व अनन्य साधारण आहे.**



बलं रक्तं श्रमं स्वेदं देहि राष्ट्राभिवृद्धये।
एकैकं श्रेयसे भूयात् किमु यत्र चतुष्टयम्॥३॥

उत्तर: राष्ट्राच्या प्रगतीसाठी शक्ती, रक्त, परिश्रम व घाम द्या. (यातील प्रत्येक गोष्ट) एकेक गोष्ट कल्याण्यासाठी कारणीभूत होईल. (हे) या चारही एकत्र आले तर त्यांच्या बद्दल काय सांगावे!

➢ **प्रयत्नांशिवाय भाग्य सिद्धिस जात नाही.**

यथा बीजं विना क्षेत्रमुप्तं भवति निष्फलम्।
तथा पुरुषकारेण विना दैवं न सिध्यति॥४॥

उत्तर: ज्याप्रमाणे बी चांगल्या प्रकारे पेरल्याशिवाय शेत फळास येत नाही. त्याप्रमाणे प्रयत्नांशिवाय दैव सिद्धीस जात नाही.

➢ **जगात अप्रिय पण हितकारक बोलणारे व एकून घेणारे दुर्लभ आहेत.**



सुलभा: पुरुषा राजन्! सततं प्रियवादिन:।
अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभ:॥५॥

उत्तर: हे राजा, नेहमी गोड बोलणारे लोक सहज मिळतात. अप्रिय पण हितकारक बोलणारा (वक्ता) आणि ऐकून घेणारा (श्रोता) मिळणे मात्र कठीण असते.

## स्वाध्याय

**प्र. १ खालील प्रश्नांची मराठीत उत्तरे लिहा.**

**१) विशाल अंत:करणाच्या माणसांसाठी पृथ्वी कशाप्रमाणे असते?**

उत्तर: ज्यांचे अंत:करण विशाल आहे त्यांच्यासाठी संपूर्ण पृथ्वीच कुटुम्बाप्रमाणे असते.

**२) राष्ट्राच्या अभिवृद्धीसाठी काय काय द्यावे?**

उत्तर: राष्ट्राच्या अभिवृद्धीसाठी शक्ती, रक्त, परिश्रम, घाम या चार गोष्टी द्याव्यात. या घटकांचे राष्ट्र कल्याण्यासाठी अनन्यसाधारण महत्त्व आहे हे चारही घटक राष्ट्राच्या कल्याणासाठी कारणीभूत आहेत.

**३) दैव कशाने सिद्धीस जात नाही?**

उत्तर: ज्याप्रमाणे शेतात चांगल्या प्रकारे बी पेरल्याशिवाय शेतात भरपूर पिक येत नाही, त्याप्रमाणे प्रयत्नांशिवाय दैव सिद्धिस जात नाही.

**४) या जगात कोण दुर्लभ आहे?**

**उत्तर:** या जगात अप्रिय पण हितकारक बोलणारा वक्ता व ऐकून घेणारा श्रोता मिळणे दुर्लभ आहे.

**५) थोर लोकांना देण्यास अयोग्य असे काही नसते या करिता कोणती उदाहरणे दिलेली आहेत?**

**उत्तर:** कर्णाने स्वत:ची त्वचा म्हणजेच कवचकुंडले जीमूतवाहन राजाने स्वत:चे प्राण, दधीचि ऋषीनी स्वत:च्या अस्थी दिल्या. या उदाहरणावरुन थोर लोकांना देण्यास अयोग्य काही नसते हे पटवून दिलेले आहे.

**प्र. २ रुपे ओळखा.**

१) अयम् = इदम् या सर्वनामाचे पुलिंगी प्रथमा एकवचन.

२) लघुचेतसाम् = लघुचेतस् या सकारान्त विशेषणाचे पुलिंगी नपुंसकलिंगी किंवा स्त्रीलिंगी षष्ठी बहुवचन.

३) उदारचरितानाम् = उदरचरित या (अ-कारान्त) सामासिक विशेषणाचे पुलिंगी किंवा नपुंसकलिंगी पष्ठी बहुवचन उदरचरिता या (आकारान्त) सामासिक विशेषणाचे स्त्रीलिंगी षष्ठी बहुवचन.

४) ददौ = दा (१ परस्मैपद, ३ उभयपद) धातूचे परोक्ष भूतकाळ तृतीय पुरुष एकवचन.

५) महात्मनाम् = महात्मन् या (न् कारान्त) सामासिक विशेषणाचे पुलिंगी षष्ठी बहुवचन.

६) वक्ता = वक्तृ या (ऋकारान्त) विशेषणाचे पुलिंगी प्रथमा एकवचन.

७) श्रोता = श्रोतृ या (ऋकारान्त) विशेषणाचे पुलिंगी प्रथमा एकवचन.

८) देयम् = दा (१ परस्मैपद, ३ उभयपद) धातुचे कर्मणि विद्यार्थी धातुसाधित विशेषण नपुंसकलिंगी प्रथमा-द्वितीया एकवचन.

**प्र. ३ खालील समास सोडवून त्यांची नावे लिहा**

१) राष्ट्राभिवृद्धये = राष्ट्रस्य अभिवृद्धि: तस्यै
= षष्ठी तत्पुरुष समास

२) प्रियवादिन: = प्रियस्य वादिन:
= षष्ठी तत्पुरुष समास

३) अप्रियस्य = न प्रियम्, तस्य
= नञ् तत्पुरुष समास

४) दुर्लभ: = दु:खेन लभ्यते अयम् इति
उपपद तत्पुरुष समास

५) अदेयम् = न देयम्
= नञ् तत्पुरुष समास

६) लघुचेतसाम् = लघु: चेत: येषाम् ते तेषाम्
= बहुव्रीही समास

७) महात्मनाम् = महान आत्मा येषाम् ते तेषाम्
= बहुव्रीहि समास

८) सुलभा: = सुखेन लभ्यन्ते इमे इति
= उपपद तत्पुरुष समास

**प्र. ६ खालील प्रश्नांची संस्कृतमधून उत्तरे लिहा.**

**१) उदारचरितानां कृते वसुंधा कीदृशी भवति?**

**उत्तर:** उदारचरितानां कृते वसुधा कुटुम्बकं भवति।

**२) कर्णेन किं दत्तम्?**

**उत्तर:** कर्णेन स्वत्वक् दत्ता।

**३) शिबिना किं दत्तम्?**

**उत्तर:** शिबिना स्वमांसं दत्तम्।

**४) जीमूतवाहनेन किं दत्तम्?**

**उत्तर:** जीमूत वाहनेन स्वजीवनं दत्तम्।

**५) दधीचिना किं दत्तम्?**

**उत्तर:** दधीचिना स्वशरीरस्य अस्थीनि दत्तानि।

**६) राष्ट्राभिवृद्धये किं किं दातव्यम्?**

**उत्तर:** राष्ट्राभिवृद्धये बलं रक्तं श्रम: स्वेंद:च एतानि सर्वाणि दातव्यानि।

**७) केन विना दैवं न सिध्यति?**

**उत्तर:** पुरुषकारेण विना दैवं न सिध्यति।

**८) के जना: दुर्लभा:?**

**उत्तर:** अप्रियस्य पथ्यस्य च वक्तार: तथा श्रोतार: अपि दुर्लभा:।

**प्र. ७ सन्धिविग्रह करा.**

१) वेति = वा + इति।

२) वसुधैव = वसुधा + एव।

३) शिबिर्मांसम् = शिबि: + मांसम्।

४) दधीचिरस्थीनि = दधीचि: + अस्थीनि।
५) नास्त्यदेयम् = न + अस्ति + अदेयम्।

**प्र. ८ समानार्थी संस्कृत शब्द लिहा.**

१) वसुधा = धरा, धरित्री, पृथिवी, भू:, भूमि, महि
२) कुटुम्बकम् = कुटुम्ब:, परिवार:, वंश:
३) श्रम: = उदयम, उद्योग:, प्रयत्न:, परिश्रम:
४) स्वेद: = घर्म:, निराक:, निदाघ, प्रस्वेद:
५) अभिवृद्धि = विकास:, समृद्धि
६) राजा = नृप:, पार्थिव, भूप:

**प्र. ९ विरुद्ध अर्थाचे संस्कृत शब्द लिहा.**

१) निष्फलम् ह्न सफलम्
२) प्रियवादिन: ह्न अप्रियवादिन:, कटुवादिन:
३) अप्रिय: ह्न प्रिय:
४) दुर्लभ: ह्न सुलभ:
५) निज: ह्न परकीय:, पर:
६) लघु ह्न गुरु
७) उदारम् ह्न अनुदारम्, कृपणम्
८) देयम् ह्न अदेयम्
९) आलस्यम् ह्न उद्यम्
१०) पथ्यम् ह्न अपथ्यम्

ज्ञानसागर अहमदनगर

*****

नोटस्